राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये दाखल झालेला तक्रार अर्ज

तक्रार क्र.रामाआ /तक्रार ७३४ /२०२२ / पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| तक्रारदार | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| संभाजी दत्तात्रय दिवेकर | १.उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे<br>२.उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दौंड जि.पुणे | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे |

<u>तक्रार सुनावणी दिनांक -दि.१४/१२/२०२३</u>

तक्रारदार यांनी दि. ०४/०९/२०२३ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

"आयोगाने व्दितीय अपील क्रमांक ११४७/२०२३/पुणे मध्ये सुनावणी होऊन दि. २४/०७/२०२३ रोजी आदेश पारित केला. त्यामध्ये आयोगाने विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पूर्व) विभाग, पुणे तसेच उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, दौंड जि.पुणे यांनी जिल्हा परिषदेला पत्र देऊन उपलब्ध रस्त्याचे अभिलेख प्राप्त करुन अपिलार्थीस आदेश प्राप्तीचे ३० दिवसाचे आत व्यक्तीशः /नोंदणीकृत टपालाने विनामुल्य पुरविण्याचे आदेश दिले. सदर आदेशाची अंमलबजावणी संबंधित अधिकारी यांनी केली नाही, अशी तक्रार तक्रारदार यांनी केली आहे.

त्यानुसार दि. १४/१२/२०२३ रोजी आयोजित सुनावणीस अपिलार्थी, तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी तसेच तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

सुनावणीचे वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. माळशिखारे यांनी आयोगास सूचित केले की, आयोगाचे आदेशाचे वेळी ते उपअभियंता, सा.बां.उपविभाग दौंड हे होते. आयोगाचे आदेशाप्रमाणे त्यांनी दि.१७/०८/२०२३ रोजी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (दक्षिण) विभाग, पुणे यांना पत्र दिले.

त्यावर कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (दक्षिण) विभाग, पुणे यांनी दि.२६/१०/२०२३ रोजी उत्तर दिले की, सदर रस्त्याची माहिती ही ४० वर्षापूर्वीची जुनी असल्याने या कार्यालयाकडे याबाबतची कोणतीही कागदपत्रे आढळून येत नाहीत.

त्यानंतर उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम (इमारती) उपविभाग, दौंड यांनी अपिलार्थीस दि.३१/१०/२०२३ रोजी उत्तर दिले.

सुनावणीचे वेळी तक्रारदार यांनी सूचित केले की, सदरचे पत्र त्यांना प्राप्त होते परंतु त्यामध्ये सदर प्रकरण ४० वर्षे जुने असल्याने अभिलेख आढळून येत नाही असे उत्तर दिले होते.

सुनावणीचे वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. माळशिखारे यांनी आयोगास सूचित केले की, आयोगाचे आदेशाचे वेळी उपअभियंता, सा.बां.उपविभाग दौंड श्री. फुलारी हे होते.

सुनावणी दरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, अपिलार्थीस दिलेल्या उत्तरामध्ये दिलेले अभिलेख ४० वर्षे जुने असल्याने आढळून येत नाही असे कळविले. तथापि सदरचे अभिलेख कोणत्या संवर्गात मोडते ? कायम स्वरुपी जतन करावयाचे अभिलेख आहेत किंवा कसे ? तसेच जर अभिलेख नष्ट केले असतील तर त्याचा पुरावा उपअभियंता, सा.बां.उपविभाग दौंड श्री. फुलारी यांनी आयोगास सादर केला नाही.

उपरोक्त पार्श्वभूमिवर आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतरिम आदेश.**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, सा.बां.उपविभाग दौंड श्री. फुलारी यांना आदेशित करण्यात येते की, त्यांनी सदरचे अभिलेख कोणत्या संवर्गात मोडते तसेच कायम स्वरुपी जतन करावयाचे अभिलेख आहेत किंवा कसे ? तसेच जर अभिलेख नष्ट केले असतील तर त्याचा पुरावा तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत आयोगास सादर करावी.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.तक्रार क्रमांक /७३४/२०२३/पुणे /5144/2023 दिनांक 13/12/23